जा.क्रं. उमाशि-१/पुवि/इ.११वी कें.प्रवेश/२०१४/ १४०६४/६६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक :- ११/६/२०१४

1 2 JUN 2014

प्रति,

प्राचार्य / मुख्याध्यापक

-----------------------------------------

----------------------------------------------

विषय :- इ. ११ वी केंद्रीय प्रवेश सन २०१४-१५.
मागदर्शक सूचना

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रं. एफईडी/१०८४/(२५६८)साशि-२/दि. ६/३/१९८६
२. शासन निर्णय क्रं.एचएससी/१०९७/(१४४४/९७)/उमाशि-१/दि.४/६/१९९७
३. शासन निर्णय क्रं.एचएससी/१०९७/(१४४४/९७)/उमाशि-१/दि.२६/६/१९९७
४. शासन निर्णय क्रं.एचएससी/२०१०/(२५/१०)/उमाशि-२/दि.२५/२/२०१०
५. शासन निर्णय क्रं.एचएससी/१०९७/(१४४४/९७)/उमाशि-१/दि.२५/३/२०१०
६. शासन निर्णय क्रं.एचएससी/१७०७/(२२२/०७)/उमाशि-१/दि.२५/३/२०१०
७. शासन पत्र क्रं.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२३६/१३/एसडी-२ दि.३/३/२०१४
८. शासन परिपत्रक क्रं.प्रवेश/२०१४/प्र.क्र.८१/एसडी-२ दि.२३/५/२०१४

पुणे व पिंपरी चिचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील / उच्च माध्यमिक विदयालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश दरवर्षी प्रमाणे केंद्रीय प्रवेश पध्दतीने परंतू सन २०१४-१५ पासून ऑनलाईन पध्दतीने केले जाणार आहेत हे आपणास विदितच आहे.

सदर इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश पध्दतीचा अवलंब करण्यासाठी खाली दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे गांभीर्याने अवलोकन करुन प्रवेशाबाबतची कार्यवाही आपल्या नियंत्रणाखाली करण्यात यावी.

१. इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश पध्दतीमध्ये कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरील प्रवेश अल्पसंख्यांक व इनहाऊस कोटयातील प्रवेश विद्यार्थ्यांना एसएससीचे गुणपत्रक मिळाल्यानंतर पहिल्या ४ दिवसात (रविवार धरुन) पूर्ण करण्यात यावेत

२. अल्पसंख्यांक संस्थांनी ५० % प्रवेश संबंधीत अल्पसंख्यांक विदयार्थी यांच्या मधून प्रवेश अर्जाद्वारे गुणवत्तेनुसार करावेत.

३. इनहाऊस कोटयामधील २० % प्रवेश माध्यमिक शाळेच्या आवारात उच्च माध्यमिक अथवा महाविद्यालयास जोडून असलेले कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर प्रवेश करावेत. सदरचे प्रवेश गुणवत्तेनुसारच करावेत.

४. व्यवस्थापन कोट्यातील ५ % प्रवेश संस्था विद्यार्थ्यांना एस.एस.सी. गुणपत्रक मिळाल्यानंतर पहिल्या दिवसापासून करु शकतील.

५. अल्पसंख्यांक राखीव जागा किंवा इनहाऊस कोटयामधून ज्यांनी प्रवेश घेतलेले आहेत. त्यांनी इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश पध्दतीने आवेदन पत्र भरण्याची आवश्यकता नाही. परंतू अन्य कनिष्ठ महाविद्यालयांसाठी असे विद्यार्थी आवेदनपत्र भरु शकतील.

६. निर्धारित केलेल्या अल्पसंख्यांक राखीव जागा ५० % , इनहाऊस कोटयातील २० % व ५ % व्यवस्थापन कोटयांतील जागांवरील प्रवेशाच्या संदर्भात एसएससी चा निकाल जाहिर झाल्याबरोबर प्रथम ४ दिवसात जेवढे प्रवेश झाले आहेत त्याची संवर्ग निहाय प्रवेशाची माहिती, विद्यार्थ्यांच्या नावांसह चौथ्या दिवशी सायंकाळी ५.०० वा. **http://pune.fyjc.org.in** या वेबसाईटवर नोंद करावयाची आहे.

**प्रपत्र 'अ' व 'ब' चा संकलन तक्ता (माध्यमनिहाय)**

**उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव :-**

| अ. क्रं. | प्रकार | तपशील | विज्ञान | | वाणिज्य | | कला | | केंद्रिय प्रवेश समितीकडे वर्ग करावयाची प्रवेश संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | विज्ञान | वाणिज्य | कला |
| अ | अनुदानीत | अल्पसंख्यांक प्रवेश ५० % | | | | | | | | | |
| | विना अनुदानीत | | | | | | | | | | |
| ब | अनुदानीत | इनहाऊस कोटयातील प्रवेश २० % | | | | | | | | | |
| | विना अनुदानीत | | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | |

७. दिनांक १३/६/१९८९ च्या शासन निर्णयानुसार एकूण जागांच्या ५ % जागा हया संबंधित उच्च माध्यमिक वर्गाच्या व्यवस्थापनाने गुणवत्तेनसार परस्पर भरण्यात यावेत. ज्या संस्थाना व्यवस्थापन कोट्यातील शिल्लक प्रवेश अथवा पूर्ण व्यवस्थापन कोट्यातील प्रवेश केंद्रिय प्रवेश समितीकडे वर्ग करावयाचे आहेत अशा संस्थांनी खालील तक्त्यामध्ये नोंद करावी.

**व्यवस्थापन कोट्यातील ५ % प्रवेशाबाबत माहिती (माध्यमनिहाय)**

**उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव :-**

| अ. क्रं. | प्रकार | तपशील | विज्ञान | | वाणिज्य | | कला | | केंद्रिय प्रवेश समितीकडे वर्ग करावयाची प्रवेश संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | विज्ञान | वाणिज्य | कला |
| १ | अनुदानीत | व्यवस्थापन प्रवेश ५ % | | | | | | | | | |
| २ | विना अनुदानीत | व्यवस्थापन प्रवेश ५ % | | | | | | | | | |
| | एकूण | | | | | | | | | | |

८. व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्यांक कोटा (५० %) / इनहाऊस (२० % ) कोटयातील प्रवेशाची यादी माहिती अधिकारात मागितल्यास संबंधितांस ती उपलब्ध करुन दयावी.

९. केंद्रीय प्रवेश समितीच्या नियमानुसार संगणक एजन्सीकडून Email द्वारे प्रवेशार्थी विद्यार्थी माहिती / वेळापत्रक दिले जाईल त्याप्रमाणे प्रवेशाची कार्यवाही करावी.

१०. विद्यार्थी गुणवत्ता यादी सॉफ्टकॉपी वरुन Hard Copy डाऊनलोड करुन प्राप्त झाल्यानंतर ती दर्शनी भागात विदयार्थ्यांना दिसेल अशा ठिकाणी लावावी.

११. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व शिल्लक राहिलेल्या जागा अनुदान प्रकार, शाखा ,माध्यम आरक्षण निहाय वेबसाईटवर ठेवाव्यात.

१२. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पारदर्शक राहील याची दक्षता घ्यावी.

१३. संगणक एजन्सीकडून प्राप्त झालेल्या गुणवत्ता यादीतील प्रवेश करताना मूळ कागदपत्रे तपासून त्याप्रमाणे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. गुणवत्ता यादीत त्रृटी आढळल्यास त्या समक्ष सादर करावी. त्याचप्रमाणे त्याबाबत श्रीमती सतिंद्रजीत कौल उपप्राचार्य, आबासाहेब गरवारे महाविदयालय यांच्याशी दूरध्वनीवरुन संपर्क करावा. यांचा भ्रमणध्वनी क्रमांक **9850812589** आहे.

१४. कॉलेज स्तरावरील प्रवेश प्रक्रिया करताना अभ्यासू व तांत्रिक व्यक्ती योग्य ते मनुष्यबळ यांचे नियोजन करावे. आवश्यकता भासल्यास पोलिस बंदोबस्तही ठेवावा.

१५. अंतिम प्रवेशाच्या यादया संबंधित सर्व कनिष्ठ महाविदयालयांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द कराव्यात.

**१६. प्रवेश प्रक्रिया कालावधीमध्ये या कार्यालयाच्या (www.dydepune.com) संकेतस्थळावर ज्या सूचना / परिपत्रके प्रसिध्द केली जातील त्याचे अवलोकन प्राचार्यांनी स्वतः करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**१७. कनिष्ठ महाविद्यालयाच्या संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेवर प्राचार्यांचे सनियंत्रण असावे.**

**१८. प्रवेश निवड यादीतील विदयार्थ्यांना कोणत्याही शाखेत प्रवेश देताना इ. १० वी मध्ये सामान्य गणित कोड क्रमांक (७४) हा विषय घेतलेल्या विदयार्थ्यांस विज्ञान, वाणिज्य व कला शाखेत गणित हा विषय घेता येणार नाही. सदर विषय निवडण्यापूर्वी पूर्ण खात्री करुनच प्रवेश दयावा.**

१९. इयत्ता ११ वी नापास विदयार्थ्यांना केंद्रीय प्रवेश पध्दतीद्वारे प्रवेश दिले जात नाहीत अश्या विदयार्थ्यांना इ. ११ वी त मूळ शाखेत अथवा शाखा बदलून प्रवेश घेवू इच्छित असल्यास संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्रवेश क्षमेतच्या मर्यादेत जागा असल्यास गुणवत्तेप्रमाणे त्यास प्रवेश दयावा.

२०. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शालान्त प्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य बोर्डाची अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा महाराष्ट्र राज्याबाहेरील राज्यातील किंवा परदेशातील विद्यार्थ्यांसाठी **योग्यता प्रमाणपत्र** पुणे विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक

शिक्षण मंडळाकडून मिळाल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यांचा **प्रवेश कायम होणार नाही.** याची संबंधित विद्यार्थ्याला प्रवेशाच्या वेळी स्पष्ट कल्पना द्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

२१. योग्यता प्रमाणपत्राच्या अभावी विद्यार्थ्यांचा तात्पुरत्या स्वरुपातील प्रवेश रद्द होणे किंवा विद्यार्थी वार्षिक परीक्षेस अपात्र ठरविला जाण्याची कार्यवाही होऊ शकते, सबब संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रांसह पुणे विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करावा व योग्यता प्रमाणपत्र मिळवावे ही जबाबदारी विद्यार्थी व संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची राहील.

२२. इ. ११ वी प्रवेशाबाबतची कार्यवाही प्राचार्यांनी वरील सूचनाप्रमाणे करणे आवश्यक असतांनाही एखाद्या विशिष्ट विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश समितीकडून अथवा शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयाकडून पत्राची अथवा चिठ्ठीची मागणी केली जाते असे पालकांकडून समजते. परंतू केंद्रीय प्रवेश समितीकडून कोणतेही पत्र अथवा चिठ्ठी देण्याची तरतूद प्रवेश पध्दतीमध्ये करण्यात आलेली नाही. तेव्हा अशा प्रकारची मागणी करु नये.

२३. प्रवेश देतांना संस्थेने/कनिष्ठ महाविद्यालयाने कोणत्याही प्रकारे विद्यार्थी /पालक व संबंधित व्यक्तींकडून कसल्याही प्रकारची देणगी व कॅपिटेशन फी घेणे सन १९८८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७ नुसार दंडनीय गुन्हा आहे.याची दक्षता घ्यावी. अशा प्रकारची देणगी व कॅपीटेशन फी घेणे हा दंडनीय गुन्हा आहे याची नोंद घ्यावी.

२४. कोणत्याही परिस्थितीत प्रवेशाबाबत विदयार्थी व पालक यांना शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे प्रवेशासाठी पाठवू नये. वस्तूस्थितीप्रमाणे विदयार्थ्यांस मागदर्शन करावे.

सदरचे परिपत्रक शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(सुमन शिंदे)
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे -१ तथा**
**अध्यक्ष**
**इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे**

**प्रत - माहितीसाठी सविनय सादर**

**१. मा. आयुक्त (शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे १**

**२. मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक)**
**शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १**